महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२१ वा | दिनांक : ०३/११/२०२५ | वार : सोमवार

## भाजपच्या ऑपरेशन लोटसला शिवसेना शिंदे गटाकडून प्रत्युत्तर



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात भाजपकडून 'ऑपरेशन लोटस'चा दणका विरोधी पक्षांसह मित्र पक्षांनाही बसत असताना, आता शिवसेना शिंदे गटाने त्याला प्रत्युत्तर म्हणून 'ऑपरेशन टायगर' सुरू केले आहे. या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिंदे गटाने थेट भाजपच्या आमदाराच्या भावालाच आपल्याकडे खेचले आहे. या राजकीय घडामोडींमुळे आता सोलापूर जिल्ह्यात भाजप विरुद्ध शिंदे सेना असे नवी राजकीय समीकरण पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्तिकी एकादशीच्या पूजेसाठी पंढरपूरला येताना 'ऑपरेशन टायगर'ला मोठी ताकद दिली. सायंकाळी सोलापूरहून पंढरपूरकडे येत असताना, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मंगळवेढा मार्गे प्रवास केला. मंगळवेढ्यात त्यांनी भाजपचे आमदार समाधान आवताडे यांचे चुलते बबनराव आवताडे आणि चुलत भाऊ सिद्धेश्वर आवताडे यांच्या कार्यालयाला भेट देऊन त्यांचा सत्कार स्वीकारला.

या भेटीदरम्यान, भाजप आमदार समाधान आवताडे यांच्या विरोधात निवडणूक लढवणारे काँग्रेसचे नेते भगीरथ भालके हेदेखील विशेषत्वाने उपस्थित होते. आवताडे कुटुंबातील सदस्यांना गळाला लावून आणि प्रतिस्पर्धी नेत्याला सोबत ठेवून, एकनाथ शिंदे यांनी सोलापूरच्या राजकारणात भाजपला थेट आव्हान देण्याची तयारी केली असल्याचे यातून स्पष्ट होते.

भाजप आमदार समाधान आवताडेंचे चुलते असलेले बबनराव आवताडे हे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष आहेत, तर त्यांचे पुत्र मंगळवेढा खरेदी-विक्री संघाचे सभापती आहेत. मंगळवेढामध्ये आवताडे बाप-लेकाची फार मोठी ताकद असल्याने, थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या कार्यालयात जाऊन सत्कार स्वीकारल्यामुळे आता लवकरच त्यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ऑपरेशन लोटसचा धडाका सुरू केला असताना, त्याला प्रत्युत्तर म्हणून शिंदे गटाने ऑपरेशन टायगर सुरू केले आहे. मंत्री उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली हे 'ऑपरेशन टायगर' सुरू असल्याची चर्चा आहे, आणि आवताडे यांच्यासोबत सामंत यांच्या बैठका झाल्याची माहिती समोर येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, आवताडे यांच्या सत्कार समारंभाला उपस्थित असलेले काँग्रेसचे नेते भगीरथ भालके यांच्याकडून मात्र शिवसेना प्रवेशाबाबत कोणतीही प्रतिक्रिया अद्याप मिळालेली नाही.

## शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्या असे अजित पवारांना वाटते का? प्रकाश आंबेडकरांचा संतप्त सवाल





**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. अजित पवार यांनी केलेल्या "सरकार शेतकऱ्यांचे कर्ज किती काळ माफ करत राहणार?" या विधानावर प्रतिक्रिया देताना आंबेडकर म्हणाले की, "अजित पवारजी, तुम्हाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात असे वाटते का?"

महाराष्ट्रातील शेतकरी आजही अवकाळी पावसामुळे, पिकांच्या नुकसानीमुळे आणि शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे मोठ्या अडचणीत आहेत. "हे शेतकरी कठोर परिश्रमाने अन्न पिकवतात, पण तुमचे सरकार त्यांच्या कष्टाची परतफेडही करू शकत नाही," असे ते म्हणाले.

सोयाबीनसाठी सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रति क्विंटल ५,३२८ रुपये असूनही शेतकऱ्यांना फक्त ३,५०० ते ४,००० रुपये भाव मिळत असल्याचा मुद्दा मांडत आंबेडकर म्हणाले की, "याचा अर्थ शेतकऱ्यांना जवळजवळ ३० टक्के तोटा सहन करावा लागत आहे. कापसाची स्थितीही तितकीच गंभीर आहे."

ते पुढे म्हणाले की, "अवकाळी पावसाने राज्यातील २९ जिल्ह्यांतील ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सरकारने मदत जाहीर केली असली तरी एक पैसाही शेतकऱ्यांच्या हातात पोहोचलेला नाही. शेतकऱ्यांनी दिवाळी अंधारात घालवली, आणि त्यांच्या आशाही पावसात वाहून गेल्या." सरकारच्या निष्क्रीय भूमिकेवर टीका करत आंबेडकर म्हणाले, "तुमच्या सरकारला शांत झोप मिळावी म्हणून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात का? शेतकऱ्यांना भिक नको, त्यांना त्यांचे हक्क हवेत!"

वंचित बहुजन आघाडीने अजित पवार यांच्या शेतकरीविरोधी विधानाचा तीव्र निषेध नोंदवला असून, राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी आंबेडकर यांनी केली आहे.

## गुवाहाटीमध्ये आमदाराने जेवण सोडले, हॉटेलवरून उडी मारणार होते :

## बंडखोरीवेळचा किस्सा सांगत संजय शिरसाटांचा गौप्यस्फोट



**नांदेड :** शिवसेनेतील ऐतिहासिक बंडखोरी आणि त्यानंतर गाजलेल्या गुवाहाटी दौऱ्याचे अनेक किस्से आजही राज्यात चवीने चर्चिले जातात. 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील' या संवादानंतर आता या पोतडीतून अजून एक मजेदार आणि धक्कादायक किस्सा बाहेर आला आहे. शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी नांदेडमधील एका कार्यक्रमात बोलताना, बंडखोरीच्या वेळी तणावाखाली आलेल्या एका आमदाराचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला. गुवाहाटीतील बंडखोरीदरम्यान शिवसेनेचे आमदार बालाजी कल्याणकर एवढे तणावाखाली होते की त्यांनी हॉटेलवरून उडी मारण्याचा विचार केला होता, असा गौप्यस्फोट संजय शिरसाट यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह २० जून २०२२ रोजी शिवसेनेत बंड पुकारले. यानंतर ते सुरतहून गुवाहाटीला गेले होते. या दौऱ्यात शहाजीबापू पाटलांचा 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील', हा संवाद चांगलाच गाजला होता. यासोबत अनेक कथा आणि किस्सेही समोर आलेत. आता संजय शिरसाट यांनीही गुवाहाटी दौऱ्यातील एक किस्सा सांगितला आहे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीला निधी दिल्याबद्दल संजय शिरसाठ यांचा नांदेडमध्ये सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांनी बोलताना शिवसेनेतील बंडखोरीदरम्यानचे अनेक अनुभव मोकळेपणाने मांडले.

"मी गेली ४२ वर्षं राजकारणात आहे. आयुष्यातील ही माझी तिसरी बंडखोरी होती, पण आमदार बालाजी कल्याणकर यांच्यासाठी ती पहिलीच वेळ होती," असे सांगत शिरसाट पुढे म्हणाले, "त्या वेळी आम्ही संख्या मोजत होतो. कल्याणकर इतके व्याकुळ झाले होते की त्यांनी जेवणही सोडले होते. चेहऱ्यावर सतत भीती होती, आमदारकी रद्द झाली तर मतदारसंघात काय परिणाम होईल? याची त्यांना चिंता होती. एवढा तणाव आला होता की ते हॉटेलवरून उडी मारण्याच्या विचारात होते.

संजय शिरसाट म्हणाले, आम्हाला एका एका आमदाराचे पडले होते. एखादा आमदार कमी-जास्त झाला असता, तर आमची सुद्धा आमदारकी रद्द झाली असती. म्हणून आम्ही बालाजी कल्याणकर यांच्यासोबत दोन माणसं नेहमी ठेवली होती.

संजय शिरसाट पुढे म्हणाले, त्यांना सांगितले कल्याणकर आम्ही करतोय, आमचा राजकारण पणाला लावतोय. उद्या काय बरे वाट होईल आम्ही डायरेक्ट वॉश आऊट होऊ. तू नवीन आहे तुला कोणीही माफ करेल, परंतु हिम्मत केल्याशिवाय काही होत नाही. हे संकट प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतात.

आज कल्याणकरने जे काम केले त्याच्या पहिले २५ आमदार झाले असतील, पाच आमदार झाले असतील मतदारसंघात जास्त काम केले का नाही. आमच्यापेक्षा हुशार तोच निघाला सगळ्यात जास्त निधी त्यांनाच घेतला, दुसऱ्यांदा निवडून आला की नाही आला. आता तुला चिंताच नाही राहिली बाप्पा, असेही संजय शिरसाट कल्याणकर यांना उद्देशून म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५

# कवितेसाठी जगणाऱ्या कवींची अनौपचारीक काव्य मैफल बहरली



**छत्रपती संभाजीनगर** : 'ध्यास गझल साहित्य समूह' आयोजित 'टेरेसवरील कवितांची' मैफल सिडको एन ४ येथे कवी माधव कुलकर्णी ह्यांचे घरी चांगलीच रंगली.ही शब्दस्नेहींची अनौपचारिक काव्य मैफल उत्तरोत्तर चांगल्या उंचीवर गेली.कवी गिरीश जोशी ह्यांच्या संकल्पनेवर आधारित ह्या मैफलीत एकापेक्षा एक आशयघन,रसाळ कवितांचे चांदणे रसिकांना वेचायला मिळाले. विविध विषयांना हात घालणाऱ्या कविता,गझला,अभंग,कवींनी सादर करून श्रोत्यांना काव्यसंतुष्ट केले.मैफलीची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली.युवा कवयित्री तन्वी न्यायाधीश ह्यांच्या,'जगायचं तर गुलमोहरासारखं जगता आलं पाहिजे' ह्या कवितेने काव्य मैफलीचा आगाज झाला.'उमलणाऱ्या कळ्यांसाठी इथे कुंपण हवे आहे,मनाच्या पारिजाताला तुझे अंगण हवे आहे'.ऋषभ कुलकर्णीची ही गझल दाद घेऊन गेली.रमेश ठोंबरे ह्यांनी,'सारे काही ऐकत होते माझे कान ,मला नको ते टाळत होते माझे कान' . ही गझल सादर करून मैफलीत रंगत आणली. गिरीश जोशी ह्यांनी सादर केलेल्या,'तिच्याकरिता खूप शहाणे वेडे झाले.एक शहाणी माझ्यासाठी वेडी आहे'.ह्या प्रेमाच्या गझलेने वातावरण गुलाबी केले.ह्यांसह गझलकार विनायक दास,पंडीत वराडे ह्यांनी देखील दर्जेदार गझला सादर करून गझल रंगांची उधळण केली.कवयित्री मंगला चौरे ह्यांनी, 'खरं सांग विठ्ठला तुला हे पटतं का?' ह्या कवितेतून अनेक सामाजिक प्रश्नांना हात घातला.प्रिया धारूरकर ह्यांनी, 'सगळाच झोल आहे' ह्या कवितेतून सभोवतालच्या गोंधळमय परिस्थितीचे चित्रण केले.शमा बरडे ह्यांनी 'दुधात साखर विरघळावी,तेव्हढे सोप्पे नसते तिचे जगणे.'ह्या कवितेतून स्त्री-जीवनाची व्यथा मांडली.ह्यांसह कस्तुरी दंताळ,ऋजुता कुलकर्णी,सुनीता पाठक,शीतल सराफ-थिगळे,ज्येष्ठ कवयित्री मंगला अवलगावकर इत्यादी कवयित्री ह्यांनी मैफलीत काव्यरंग भरले.तसेच कवी डॉ.सुशील सातपुते ह्यांनी,'तू लिही निर्भीडपणे ,समाजातलं वास्तव,जे कधी समाजाला पचणार नाही ,अन् पचलं तर रुचणार नाही' ही कविता खास शैलीत सादर केली.'पुत्र वियोगामुळे रडून पदराला डोळे पुसणाऱ्या आईची व्यथा' कवी कैलास कोळपकर मांडली.ह्यांसह कवी माधव कुलकर्णी,प्रशांत नानकर,विनय कोळपकर,नारायण पांडव,सुहास महाजन,अरविंद कुलकर्णी,योगेश अक्कर इत्यादी कवींनी देखील दर्जेदार कविता सादर करून मैफल गाजवली.ज्येष्ठ कवी प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी ह्यांच्या कवितेने मैफलीची सांगता झाली.कवी गिरीश जोशी,प्रशांत नानकर ह्यांनी बहारदार सूत्रसंचालन करून मैफलीत जीव ओतला.दर्दी काव्य रसिक मैफलीसाठी उपस्थित होते.ह्या मैफलीच्या यशस्वीतेसाठी कवी माधव कुलकर्णी,गिरीश जोशी,रमेश ठोंबरे ह्यांनी परिश्रम घेतले.

# रोटरी क्लब मुरूम सिटीतर्फे तुळशी वृंदावन वाटप कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तुळशी विवाहाच्या शुभ मुहूर्तावर रोटरी क्लब मुरूम सिटीतर्फे आयोजित “तुळशी वृंदावन वाटप कार्यक्रम” अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात सुमारे १०० तुळशी वृंदावनांचे वाटप करण्यात आले.हिंदू धर्मात तुळशीला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालं आहे. तुळशीचे आयुर्वेदातही महत्वाची वनस्पती म्हणून महत्व विशद करण्यात आलं आहे.हिंदू धर्मात तुळशीला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालं आहे. तुळशीचे आयुर्वेदातही महत्वाची वनस्पती म्हणून महत्व विशद करण्यात आलं आहे. भगवान विष्णूची अत्यंत प्रिय रास आणि माता लक्ष्मीचं निवासस्थान म्हणूनही तुळशीच्या रोपाकडे पाहिलं जातं. अशात तुळस घरोघरीही पूजली जाते. तुळशीचे रोप घरात लावल्याने घरातील वातावरण शुद्ध आणि सकारात्मक होते, असे विज्ञानही मानते. या कार्यक्रमाचे ठिकाण विठ्ठल मंदिर, विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना जवळ, मुरूम येथे धार्मिक विधी, तुळशी पूजन आणि हरिनाम संकीर्तनाने भक्तीचा माहोल निर्माण झाला होता. या प्रसंगी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष रोटे प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, तसेच रोटे संतोष कांबळे, रोटे सुनिल राठोड, रोटे भूषण पाताळे, रोटे प्रकाश रोडगे, रोटे डॉ. नितीन डागा, रोटे राजाराम वाकडे, रोटे डॉ. महेश स्वामी, रोटे ॲड. उदय वैद्य, रोटे सुधीर पंचगल्ले आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून “सेवा हीच खरी पूजा” या ब्रीदवाक्याखाली रोटरी क्लबने समाजात श्रद्धा, भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. रोटरी क्लब मुरूम सिटीतर्फे आयोजित हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल उपस्थित नागरिक आणि मान्यवरांनी अभिनंदन व्यक्त केले.

# आष्टा कासार येथील पद्मावती देवीची यात्रा मोठ्या उत्साहाने पार पडली.



**आष्टा कासार (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : लोहारा-येथील पद्मावती देवी मंदिराची यात्रा आज मोठ्या उत्साहाने पार पडली. प्रारंभी पद्मावती देवी ची पालखी व भव्य मिरवणूक सवाद्य काढण्यात आली होती. जैन धर्म की जय, पद्मावती देवीचा जयजयकार करत, देवीच्या गाण्यावर नाचत गात मनोभावे पूजा करण्यात आली. यावर्षी अतिरिक्त पावसामुळे पद्मावती देवी मंदिराचे बांधकामांचे जिर्णोद्धार करण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला व लागलीच त्या कामाची भूमिपूजन करण्यात आले. यावेळी समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक नेमिनाथ राव आगर थडे, मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते रतिलाल आगरथडे, जिनदास पाटील ,पार्श्वनाथ आगरखेड ,सचिन खोबरे, सुनील भस्मे, अभिनंदन आगरथडे ,विलास वराडे, अभिनंदन भस्मे, सचिन आगरखेड,वसंतराव आगरखेड, प्रदीप आगरथडे, राजेंद्र आगरथडे, तसेच कासार जैन समाजातील अनेक महिला भक्तगण उपस्थित होते. यावर्षी पद्मावती देवी मंदिर ची यात्रा संपन्न झाल्यानंतर महाप्रसाद करण्याचा कार्यक्रम राजकुमार आगरखेड यांनी केला.

## मीठ



मी आहे मीठ
वापरा मला निट
कमी जास्त होता
घरात सदा किटकिट

जन्म होतो माझा
समुद्राच्या पाण्यात
रोज रोज असतो
प्रत्येकाच्या खाण्यात

विविध आजाराला
करतो मी मुक्त
जेव्हा असतो मी
आयोडीनयुक्त

जुलाबावर जालीम उपाय
मीठ साखरेचे पाणी
आजारी माणसाला
जणू मी संजिवनी

सहज उपलब्ध होणारा
तसा मी स्वस्त
योग्य प्रमाण असल्यास
जेवण होते मस्त

**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

## एक भाऊबीज पालावरील उपेक्षितांसाठी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील आदर्श महाविद्यालय व झोपडपट्टीच्या मध्यभागी उघड्या राणावर कित्येक वर्ष पाल ठोकून वास्तव्यास असणाऱ्या आणि सतत स्थलांतर करणाऱ्या उपेक्षित , वंचित आणि गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजबांधवासाठी आज दीपावली निमित्त त्यांच्या वस्तीत जाऊन प्रत्यक्षपणे एसएनडीटी विद्यापीठ समाजकार्य विभागाच्या प्रा.डॉ.प्रतिमा कांबळे यांच्या वतीने व समाज विकास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भाऊबीज साजरी करण्यात आली. लहानथोर मुलांना आणि मुलींना, कपडे, शैक्षणिक साहित्य आणि महिलांना शौल भेट देण्यात देऊन कुटुंबास फराळ वाटप करण्यात आले. ना छत, ना भिंत असलेल्या या उजाड परिसरात काळजाला खिंडार पडलेल्या अवस्थेत राहणाऱ्या या उपेक्षितांसाठी एक मायेचा ओलावा, एक छोटासा मदतीचा हात आणि भाऊबीजेची एक मैत्रेय भेट देण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्या प्रा.डॉ.प्रतिमा कांबळे, कॉ .गोविंदराव पानसरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धोधन कांबळे अर्जापूर व श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथील प्रा.नागसेन कांबळे यांच्या पुढाकाराने आणि भूमिपुत्र वाघ समाजविकास संस्था उमरगा यांच्या सहयोगाने उमरगा शहराच्या पूर्वेस बसलेल्या या जिव्हाळघरट्यांमध्ये भाऊबीज साजरी करण्याच्या उद्देशाने भूमिपुत्र वाघ यांची भेट घेऊन एकूण भेटवस्तू त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या .खरे तर समता,स्वातंत्र्य ,बंधुता ,सामाजिक न्याय,ममत्व,प्रेम,जिव्हाळा,मैत्री हे शब्द म्हणजे केवळ बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी होऊन बसले आहेत.हे शब्द आणि संकल्पना केवळ व्याख्यानापुरत्या आणि पुस्तकापुरत्या मर्यादित होऊन बसतात की काय अशी परिस्थिती आज येऊन ठेपली आहे.राजकारणातील उदासीनता व समाजकारणातील निरुत्साह यामुळे समाजस्वास्थ्य बिघडून जाऊन एकीकृत समाजाची संकल्पनाच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.संवेदना बोथट होत चालल्या आहेत .पावलो पावली औदासिन्य पसरत चालले आहे.अशा परिस्थितीत नाथाबाई ठाकरसी विद्यापीठातील समाजकार्य विभागाने मनावर घेऊन खास धाराशिव जिल्हा आणि उमरगा शहर हे अतिवृष्टीने होरपळून निघाले असताना पालावरील या उद्धस्त कुटुंबांना ना कुठले अनुदान आहे,ना शासन स्तरावरील कुठली मदत.अशा विपन्नावस्थेत जगणाऱ्या कुटुंबांना कांहीं एक मदत मिळावी म्हणून पुणे विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाने जाणीवपूर्वक उमरगा शहरातील या वस्तीची निवड करून मदत उभारली.या कमी समाजविकास संस्थेचे भूमिपुत्र वाघ यांचे खूप सहकार्य लाभले.समाजविकास संस्थेच्या वतीने बऱ्याच वर्षांपासून पालावरील कुटुंबासोबत दिवाळी साजरी केली जाते.समाजविकास संस्थेच्या माध्यमातून भूमिपुत्र वाघ यांचे या परिसरात चांगले काम आहे.महाराष्ट्रातील अनेक व्यक्ती,संस्था त्यांच्या पाठीशी अशा कठीण काळात मदतीसाठी उभ्या राहतात हाच धागा पकडून पुणे विद्यापीठातील प्रा.डॉ.प्रतिमा कामकर कांबळे यांनी आपल्या कुटुंबासोबत प्रत्यक्ष वस्तीत येऊन अनेक जीवनोपयोगी वस्तू थेटपणे हस्तांतरित केल्या.या सबंध प्रक्रियेत समाजविकास संस्थेचे भूमिपुत्र वाघ यांचे बहुमोल सहकार्य लाभले अशी प्रतिक्रिया डॉ.प्रतिमा कांबळे यांनी दिली.उपस्थित सर्वांनी सहसंवेदना व्यक्त केल्या.शेवटच्या क्षणी अचानक माजी खासदार प्रा.रवींद्र गायकवाड यांनीही वस्तीस भेट देऊन शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी मॉर्निंग वॉक, उमरगा ,चे मा.राज जाधव, ॲड.मंगेश येळीकर,अभियंता आकाश सूर्यवंशी,डॉ.निकिता वाघ,समाजसेविका सुरेखाताई मलंग,नाबाड बँकेचे प्रल्हाद जोशी,सौ.पूनम सिद्धोधन कांबळे,सौ.प्रमिला राजीव पांडगळे,सौ.विजयाताई वाघ, कु.प्रगती राजीव पांडगळे,व इतर सर्व समाजविकास संस्थेचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाचे घवघवित यश




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे सीएटीसी 230 कॅंप दि.24 ऑक्टोबर ते 02 नोव्हेंबर 2025 रोजी वार्षिक शिबिर संपन्न झाले. 53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्यावतीने या कॅंपचे आयोजन करण्यात आले होते. कमान अधिकारी कर्नल संतोष नवगण व कर्नल वाय बी सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅंप पार पडला . या कॅंप मध्ये कर्नल संतोष नवगण यांनी कॅडेटसना चरित्र, नेतृत्व ,देशभक्ती ,शिस्त , एकता , अनुशासन , फायरिंग , ड्रिल , कवायत , खेळ , फायरिंग, प्लॅग एरिया, सांस्कृतिक कार्यक्रम आदी गुणांचा अंगीकार करून राष्ट्राच्या उभारणी मध्ये हातभार लावण्याचे आव्हान केले .कॅंप दरम्यान झालेल्या विविध क्षेत्रात अति विशिष्ट कार्य केलेल्या कॅडेसटना प्रमाणपत्र, मेडल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला . मुलीमध्ये बेस्ट कॅडेट इन कॅंप वैभवी शेंडगे, उत्कृष्ट खेळाडु सुशांत जाधव व सानिया शेख , गार्ड ऑफ ऑनर सुशांत जाधव , वैभवी शेंडगे , प्रेम बेरड , वैष्णवी कांबळे पायलटिंग पंकज जमादार , कृष्णा जमादार, सानिया शेख व्हॉलीबॉल प्रेम बेरड,पंकज जमादार ,कृष्णा जमादार , राम ममाळे, सुशांत जाधव ,वैभवी शेंडगे सानिया, शेख वैष्णवी कांबळे या सर्व कॅडेटसनी वेगवेगळ्या क्षेत्रात घवघवित यश संपादन करून महाविद्यालयाचा दबदबा कायम राखला .या कॅम्पच्या यशस्वीतेसाठी सुभेदार मेजर शंभू सिंग, उत्तम पाटील, बाजीराव पाटील तसेच सर्व पीआय स्टाफ व एनसीओ , जेसिओ बटालियनचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष आश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ प्राचार्य डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे , डॉ पदमाकर पिटले कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले व सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका , शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


गोरक्षजालंदरचर्पटाचश्र अड्बंगानीफमच्छिंदराद्या:
चौरंगिरेवाणकभत्रिसंज्ञा भुम्यां बभूवुर्नवनाथसिध्दा:




श्री गोरक्षनाथ महाराज प्रकट दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

श्री अशोकराव भाले

खामगाव गोरक्षनाथाचे ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ नोव्हेंबर २०२५

# एक आरोग्य : मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या सुसंवादातून शाश्वत आरोग्याचा समाजशास्त्रीय मार्ग

०३ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'एक आरोग्य दिन' (One Health Day) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे महत्त्व केवळ वैद्यकीय परिघात मर्यादित नाही, तर तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक जबाबदारीचा जागरूक संदेश देतो. आजच्या जगात माणसाचे आरोग्य हे स्वतंत्रपणे समजून घेणे अशक्य झाले आहे. कारण मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे जीवन परस्परांशी घट्ट गुंतलेले आहे. 'एक आरोग्य' ही संकल्पना याच परस्परसंबंधाचा विचार करून सांगते की पृथ्वीवरील सर्व सजीव आणि त्यांच्या परिसरातील नातेसंबंध हे आरोग्याच्या मूळ गाभ्याशी निगडित आहेत. म्हणजेच मानवाचे आरोग्य प्राण्यांच्या आणि पर्यावरणाच्या आरोग्याशी अविभाज्य आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता ही संकल्पना केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक रचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, पर्यावरणीय नीती आणि मानवी वर्तन यांचा समग्र आरसा बनते.'एक आरोग्य' (One Health) ही संकल्पना जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (WOAH), संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना (FAO) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) यांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. या तत्त्वानुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे, आणि कोणत्याही घटकातील असमतोल संपूर्ण जगाच्या आरोग्यसाखळीला धोक्यात आणतो. याचे अत्यंत ठळक उदाहरण म्हणजे 'कोविड-१९' महामारी, जी प्राण्यांकडून मानवाकडे पसरलेल्या झूनोटिक रोगाचे द्योतक ठरली. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, सुमारे ६० टक्क्यांहून अधिक संसर्गजन्य रोग हे प्राण्यांकडून मानवाकडे पसरणारे म्हणजेच झूनोटिक रोग आहेत. समाजशास्त्रीय विश्लेषणात हे दिसते की या रोगांचा प्रसार केवळ जैविक कारणांमुळे नसून, मानवी वर्तन, पर्यावरणाचा नाश, जंगलतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण, आणि प्राण्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप यांमुळेही होतो.आजच्या काळात आरोग्याच्या प्रश्नांकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर अनेक परस्पर-संबंध उलगडतात. समाजशास्त्र सांगते की आरोग्य हे केवळ आजार नसण्याची स्थिती नाही, तर शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनाची अवस्था आहे. ही अवस्था समाजातील मूल्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक आचारांवर अवलंबून असते. उदा. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पोषणाची कमतरता ही केवळ वैद्यकीय समस्या नसून ती सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील प्रदूषण, ध्वनीकल्लोळ, आणि मानसिक ताणतणाव हे आधुनिक जीवनपद्धतीचे उपउत्पादन आहेत. त्यामुळे 'एक आरोग्य'ची कल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या चौकटीत बसवते.भारतीय परंपरेतही 'एक आरोग्य'सदृश विचारांचे दर्शन होते. प्राचीन ग्रंथांमध्येही मानव आणि निसर्गाच्या सुसंवादाला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. मानवाचे आरोग्य आणि विश्वाचे संतुलन एकसंध मानले गेले आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना पृथ्वीवरील सर्व सजीव एकाच कुटुंबाचे घटक असल्याचा संदेश देते. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे मानवाने निसर्गाच्या सहजीवनाची ही मूल्यव्यवस्था विसरली आहे. परिणामतः पर्यावरणीय ऱ्हास, जलवायू बदल, हवामानातील अस्थिरता, अन्नसाखळीतील विषारी रासायनिक हस्तक्षेप, तसेच प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश या सर्वांनी मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम केला आहे.'एक आरोग्य' दृष्टिकोन समाजात शाश्वत आणि न्याय्य आरोग्यव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय ठेवतो. तो आरोग्याचा प्रश्न केवळ डॉक्टर-रुग्ण संबंधात मर्यादित न ठेवता, शासन, शिक्षण, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि नागरिक जबाबदारी या सर्व क्षेत्रांत पसरवतो. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार आरोग्यविषयक असमानता ही सामाजिक विषमतेशी थेट संबंधित आहे. गरीब, महिला, आदिवासी, स्थलांतरित मजूर आणि ग्रामीण समाजातील दुर्बल घटक हे आरोग्य संकटांचे सर्वाधिक बळी ठरतात. त्यांना स्वच्छ पाणी, पोषण, आणि आरोग्यसेवा मिळविण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'एक आरोग्य' ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरते.पर्यावरणीय असंतुलन हा आरोग्याचा सर्वात मोठा सामाजिक धोका बनला आहे. वृक्षतोड, प्लास्टिक संस्कृती, रासायनिक शेती, प्रदूषण आणि औद्योगिक कचरा यांमुळे माती, पाणी आणि हवा दूषित झाली आहे. या प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, कर्करोग, अन्नातील विषारी घटक, तसेच मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक वाढले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की हे केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहेत, कारण या परिस्थितीचा सर्वाधिक फटका दुर्बल वर्गांना बसतो. 'एक आरोग्य' या दृष्टीकोनातून समाजाला पर्यावरणीय न्यायाची नवी संकल्पना मिळते, जिथे प्रत्येक व्यक्तीला निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार मिळतो.ग्रामीण भारतात अजूनही आरोग्य आणि पशुवैद्यकीय सेवा वेगळ्या पातळीवर कार्य करतात. परंतु 'एक आरोग्य' संकल्पनेनुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण या तिन्ही घटकांचे आरोग्य एकत्रित विचारात घेतल्याशिवाय झूनोटिक रोगांना रोखता येणार नाही. उदा. दुधाळ प्राण्यांचे लसीकरण, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचे परीक्षण, शेतीतील रासायनिक वापर यांचे एकत्रित नियोजन केल्यास मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतो. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग, पशुवैद्यक तज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ आणि समाजकार्यकर्ते यांचे एकात्मिक सहकार्य आवश्यक आहे.'एक आरोग्य'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मानसिक आरोग्य. आधुनिक जीवनशैली, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता, सामाजिक एकाकीपण आणि नैसर्गिक संसाधनांपासून तुटलेला मानवी संबंध हे सर्व मानसिक असंतुलनाचे कारण बनले आहे. संशोधन दर्शविते की निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या समाजांमध्ये मानसिक आरोग्य अधिक संतुलित असते. त्यामुळे समाजशास्त्रीय पातळीवर मानसिक आरोग्याचे आणि पर्यावरणाशी असलेल्या नात्याचे पुनर्संयोजन करणे आवश्यक आहे.'एक आरोग्य दिन' आपल्याला शाश्वत विकास उद्दिष्टांची आठवण करून देतो. संयुक्त राष्ट्रांच्या २०३० टिकाऊ विकास कार्यक्रमात "आरोग्य आणि कल्याण", "स्वच्छ पाणी आणि स्वच्छता", "हवामान कृती", आणि "जमिनीवरील जीवन" ही उद्दिष्टे 'एक आरोग्य'च्या तत्त्वांशी थेट जोडलेली आहेत. हे केवळ जागतिक ध्येय नसून प्रत्येक देश, राज्य, आणि गावाच्या स्तरावर अंमलात आणण्याजोगे मार्गदर्शक तत्त्व आहे. शालेय शिक्षणापासून ते आरोग्यसेवा, कृषी आणि उद्योग क्षेत्रापर्यंत या संकल्पनेचे सामाजिक आकलन झाल्यास 'आरोग्यपूर्ण समाज' निर्माण होऊ शकतो.समाजशास्त्रीय विश्लेषणात 'एक आरोग्य' ही संकल्पना मानवाच्या वर्तनातील बदलाचे आवाहन करते. ती सांगते की आरोग्याचा प्रश्न फक्त वैयक्तिक जबाबदारीचा नाही, तर सामाजिक एकत्रिकतेचा आहे. आपल्या आहाराच्या सवयी, उपभोग संस्कृती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि प्राण्यांविषयी संवेदनशीलता या सर्व गोष्टी समाजाच्या आरोग्यदृष्टीला आकार देतात. म्हणूनच 'एक आरोग्य' ही एक चळवळ बनली पाहिजे, जी व्यक्तीच्या आरोग्यापलीकडे जाऊन पृथ्वीच्या आरोग्याचे संरक्षण करेल.शेवटी, 'एक आरोग्य दिन' हा मानवतेच्या परस्परसंबंधांचा सण आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की माणूस निसर्गापासून वेगळा नाही. पृथ्वी, प्राणी, वनस्पती, हवा, पाणी आणि मानव हे सर्व एकाच जीवनसाखळीचे घटक आहेत. या साखळीतील कोणताही घटक दुर्लक्षित झाला, तर संपूर्ण आरोग्यव्यवस्था असंतुलित होते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याचा विचार करताना समता, न्याय, सहजीवन आणि पर्यावरणीय जबाबदारी हे मूलभूत तत्त्व ठरतात. 'एक आरोग्य' म्हणजे आरोग्याचा सर्वसमावेशक लोकशाही मार्ग होय. जिथे विज्ञान, समाज, निसर्ग आणि मानवता एकत्र येऊन शाश्वत जग निर्माण करतात.०३ नोव्हेंबरचा 'एक आरोग्य दिन' साजरा करणे म्हणजे केवळ आरोग्याचा दिवस पाळणे नव्हे, तर मानवाने आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. आपले आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे तिन्ही एका सूत्रात बांधलेले आहेत, या जाणिवेनेच खऱ्या अर्थाने "एक आरोग्य" साकार होईल. कारण शेवटी, मानवाचे आरोग्य पृथ्वीच्या आरोग्यापासून वेगळे नाही; ते दोन्ही एकाच अस्तित्वाच्या दोन बाजू आहेत.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. - ९९६०१०३५८२**
**ईमेल - bagate.rajendra५@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002